(रजि. नं. ई २१ दि. १३/०७/१९५३)

सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी

## जिल्हा शाखा जळगाव

''रेडक्रॉस भवन'', सिव्हिल हॉस्पिटल शेजारी, जळगाव फोन नं. ०२५७- २२२६२३३,२२३५८५५,२२३६२५५

Email - ircs_ jal@yahoo.in, ircs1953@gmail.com

Web.: www.redcrossjalgaon.org FB.: Ircsjalgaon

Please Download Red Cross Jalgaon App

दिनांक - २९/१२/२०२०

## वार्षिक सर्वसाधारण सभा क्रं ६१ व्या सभेची सूचना

प्रति,

सन्माननिय सभासद

सप्रेम नमस्कार,

इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव, सन २०१९-२०२० ची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक - २३/०१/२०२१ रोजी दुपारी ठीक - ४.०० वाजता संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मा. श्री. अभिजित राऊत (भा.प्र.से.) यांचे अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मायादेवी मंदिरासमोर, महाबळ रोड, जळगाव येथे आयोजित केली आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

### - सभेचे विषय -

१) दिवंगतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करणे. २) सोमवार दिनांक - २९/११/२०१९ रोजी झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.३) आर्थिक वर्ष २०१९ - २०२० चा रेडक्रॉस, रक्तपेढी, जेनेरीक मेडिसीन प्रकल्प, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पाटील धर्मार्थ दवाखाना, आधार व ई सेतु सुविधा केंद्र,कोरोना महामारीतील केलेले कार्य आणि विविध उपक्रमांचा वार्षिक कामकाजाचा कार्यअहवाल सादर करणे. ४) आर्थिक वर्ष २०१९ - २०२० चे अंकेक्षित नफा तोटा पत्रके व ताळेबंद सादर करून मंजूरी घेणे. ५) आर्थिक वर्ष २०२०- २०२१ करीता उत्पन्न खर्चाचे अंदाज पत्रक सादर करून मंजूरी घेणे. ६) आर्थिक वर्ष २०२० - २०२१ करीता ऑडिटरची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणे.

७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणे.

टीप- १) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास, तहकूब सभेचे कामकाज नियमाप्रमाणे अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी सुरु होईल, अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही. २) आर्थिक वर्षातील हिशेबाच्या व्यवहारासंबंधीचे किर्द, खतावण्या, पावत्या, तपासणी अहवाल दिनांक - २१/०१/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळात सभासदांनी लेखी मागणी केल्यास प्रशासकीय कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. ३) सभेसंबंधी आपल्या काही सूचना किंवा आयत्या वेळेच्या विषयांसाठी विषय असल्यास कृपया लेखी स्वरुपात दि. २१/ ०१ /२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत रेडक्रॉस कार्यालयात आणून द्यावेत ही विनंती. ४)कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता शासन निर्धारित सर्व नियमांचे (मास्क, सॅनीटायझर,सुरक्षित अंतर) पालन करण्यात येईल. ५) कृपया सभेस येतांना अहवाल सोबत आणावा ही विनंती. ६) फक्त सभासदांनाच सभेस उपस्थित राहता येईल.

सही/-
विनोद बियाणी
मानद सचिव

सही/-
गनी मेमन
उपाध्यक्ष

## इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगाव

### कार्यकारिणी मंडळ

| अ.क्र. | कार्यकारिणी व पदाधिकारी नाव | पद | समिती चेअरमन |
|---|---|---|---|
| ०१ | श्री अभिजीत राऊत (भा.प्र.से.) | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष | विद्यमान अध्यक्ष |
| ०२ | डॉ. अविनाश ढाकणे (भा.प्र.से.)<br>कार्यकाळ (११.०२.२०१९ ते १८.०६.२०२०) | तत्कालीन अध्यक्ष<br>आयुक्त - परिवहन विभाग (महाराष्ट्र राज्य), मुंबई | तत्कालीन अध्यक्ष |
| ०३ | श्री. गनी अब्दुल मजीद मेमन | उपाध्यक्ष | रेडक्रॉस इस्टेट नियोजन समिती |
| ०४ | श्री. विनोद लक्ष्मीनारायण बियाणी | मानद सचिव | खरेदी समिती व शिस्तपालन नियोजन समिती |
| ०५ | डॉ. प्रसन्नकुमार चंपालाल रेदासनी | चेअरमन (रक्तपेढी) | चेअरमन (रक्तपेढी) |
| ०६ | श्री. सतिष पुरणमल चरखा | कोषाध्यक्ष | अर्थ समिती |
| ०७ | श्री. राजेश कमलाकर यावलकर | सह सचिव | ज्युनिअर व युथ रेडक्रॉस समिती |
| ०८ | श्री. अनिल झुंबरलाल कांकरीया | सह कोषाध्यक्ष | रक्तपेढी सचिव |
| ०९ | श्री. घन:श्याम त्र्यंबक महाजन | कार्यकारिणी सदस्य | जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र समिती - नोडल ऑफिसर |
| १० | डॉ. विजय कृष्णा चौधरी | कार्यकारिणी सदस्य | प्रथमोपचार प्रशिक्षण समिती |
| ११ | श्री. अशोक भवरलाल जैन | कार्यकारिणी सदस्य | नवीन प्रकल्प संकल्पना व निधी संकलन समिती |
| १२ | प्रा. शेखर मधुकर सोनाळकर | कार्यकारिणी सदस्य | जेनेरिक मेडिसीन व दीर्घायु दवाखाना समिती |
| १३ | सौ. पुष्पाताई किशोर भंडारी | कार्यकारिणी सदस्या | महिला सक्षमीकरण समिती |
| १४ | श्री. संदीप किसन काबरा | कार्यकारिणी सदस्य | आंतरराष्ट्रीय संपर्क समिती |
| १५ | श्री. सुभाष सागरमल सांखला | कार्यकारिणी सदस्य | आपत्ती व्यवस्थापन समिती |
| १६ | डॉ. अपर्णा बेंजामिन मकासरे | कार्यकारिणी सदस्य | आरोग्य संवर्धन समिती |
| १७ | श्री. धनंजय मधुकर जकातदार | कार्यकारिणी सदस्य | कर्मचारी कल्याण व प्रशिक्षण समिती |
| १८ | श्री. अनिल तोताराम शिरसाळे | कार्यकारिणी सदस्य | शालेय शिक्षण समिती |
| १९ | डॉ. सुभाष सदाशिव राणे | कार्यकारिणी सदस्य | नर्सिंग व जीवन कौशल्य प्रशिक्षण समिती |

## सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा जळगाव

## अध्यक्षीय मनोगत



**अभिजित राऊत (भा.प्र.से.)**
रेडक्रॉस अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी

**सन्माननीय सभासद सस्नेह नमस्कार,**

**सर्वप्रथम सर्व सभासदांचे व उपस्थित मान्यवरांचे स्वागत व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !**

गेल्या आर्थिक वर्षात आपल्या संस्थेने विविध सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून केलेल्या सेवाकार्याचा व आर्थिक वर्ष दि. १ एपिल २०१९ ते दि. ३१ मार्च २०२० अखेरचा वार्षिक अहवाल, अंकेक्षित नफा तोटा पत्रके व तेरीज ताळेबंद आपणासमोर सादर करतांना मनस्वी आनंद होत आहे. यावर्षी सर्व सेवाकार्याच्या आघाड्यांवर प्रगती करत संस्थेच्या सेवा कार्याचा आलेख उंचावला आहे, अर्थातच यात सर्व सभासद, कार्यकारिणी मंडळ, हितचिंतक, रक्तदाते, रक्तदान शिबीर आयोजक, दानशूर देणगीदाते, समाजसेवक, स्वयंसेवक, कर्मचारी यांचे बहुमोल मिळालेले सहकार्य याबद्दल कार्यकारिणी मंडळाच्या वतीने हार्दिक अभिनंदन करतो.

संस्थेने सर्व सेवाकार्याच्या आघाड्यांवर केलेली प्रगती म्हणजेच समाजाच्या अढळ विश्वासाचे द्योतक आहे. कार्यकारिणी मंडळातील सर्व सहकाऱ्यांनी तत्कालीन अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी आणि सध्या माझ्या मार्गदर्शनाखाली केलेली प्रगती व सेवा कार्यावर भर देवून प्रगत शास्त्रीय व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सामुहिक निर्णय प्रक्रिया, गतिमान प्रशासन व सेवाभावी दृष्टीकोन या पंचसुत्रीची सतत अंमलबजावणी केली तसेच कार्यकारिणी मंडळाने महत्वाचे धोरणात्मक निर्णय योग्यवेळी तत्परतेने घेतले. असे निर्णय घेतांना शास्त्रशुद्ध पारदर्शकता, जनहित, आणि समाज उपयोगी सेवाकार्य यावर भर देण्यात आला. सर्व सामान्यांसाठी करीत असलेल्या सेवाकार्याचे सर्वच स्तरातून समाधानकारक प्रतिसाद मिळत आहे याचा अनुभव वारंवार होत आहे.

गेल्या आर्थिक वर्षातील सेवाकार्याचा थोडक्यात गोषवारा सादर करीत आहे.

### २४ तास रक्तपेढी सेवा :-

संस्थेचा प्रमुख उपक्रम रक्तपेढी- यावर्षी २०५५० रक्तयुनिट्सची उलाढाल झाली. रक्तसंकलनासाठी वातानुकूलित रक्त संकलन वाहन कार्यरत, अद्ययावत व सुधारित तंत्रज्ञानाने सुसज्ज, नॅट (NAT) प्रणालीयुक्त रक्तपेढी, डेंगू, विषारी मलेरिया बाधित रूग्णांना प्लेटलेट्स २०५ एस.डी.पी आणि ९८४ आर.डी.पी. रक्तपिशव्या व रक्तघटकांचा रुग्णांना पुरवठा करून जीवनदान देण्यात आले आहे. या वर्षात १७७९ (PCV) पी.सी.व्ही थॅलेसीमिया रूग्णांना विनामूल्य देण्यात आल्या.जिल्ह्याभरातील ७० ते ८० % थॅलेसीमियाग्रस्त रूग्णांना रक्तपुरवठा हा आपल्या रक्तपेढीमार्फत होतो. या सेवेत आपला मोलाचा वाटा आहे ही अभिमानास्पद बाब आहे. तसेच या थॅलेसीमिया रूग्णांना नॅट (NAT) प्रमाणित रक्ताचा पुरवठा व्हावा म्हणून संस्थेकडून थॅलेसीमिया बालक दत्तक योजना सुरू करण्यात आली असून या योजनेस समाजातील दानशूर व्यक्तींचे योगदान मिळाले आहे. यात थॅलेसीमिया बालकाला वर्षासाठी दत्तक योजनेत आपण रु.१०,०००/- वार्षिक देणगी देऊन त्या रूग्णांस नॅट (NAT) प्रमाणित रक्त देऊ शकतो जेणेकरून या रूग्णांचे जीवनमान उंचावेल.

रक्तपेढी मार्फत नियमितपणे रक्तदान शिबीरे आयोजित केली जातात. रक्तदानाच्या प्रचार व प्रसाराकरिता एफएम रेडीयो, बॅनर, पोस्टर्स च्या माध्यमातून रक्तदानाबाबतची जनजागृती केली जाते, तसेच एस.एम. एस व सोशल मिडियाच्या माध्यमातून वेळोवेळी आवाहन करण्यात येते. रक्त संकलना करिता संस्थेचे वातानुकूलित वाहन आहे. त्या माध्यमातून रक्तपेढी आपल्या दारी या उपक्रमांतर्गत रक्त संकलन केले जाते.

रक्तदात्यांच्या परिवाराचे आर्थिक संरक्षण म्हणून एका सामाजिक भावनेतून रक्तदाता अपघात विमा योजना सुरु असून त्यात किमान रू.५०,०००/- ते रू.२,००,०००/- रकमेचे अपघाती विमा संरक्षण करण्यात येते, या योजनेअंतर्गत आतापर्यंत अपघातात मृत पावलेल्या १६ रक्तदात्यांच्या वारसांना एकूण ९ लाख रुपये विमा रक्कम विमा कंपनीकडून रेडक्रॉस मार्फत मिळवून देण्यात आलेली आहे.

आर्थिक दृष्ट्या दुर्बल गरजू रूग्णांना विनामूल्य रक्तपुरवठ्या करीता जीवनदान योजना सुरु असून या योजेनेत रु. २१०००/- व त्या पटीत दानशूर दात्यांकडून देणगी रक्कम स्वीकारली जाते, या योजने अंतर्गत दरवर्षी कायमस्वरूपी एक रक्तपिशवी आर्थिक दृष्ट्या दुर्बल गरजू रूग्णांना विनामूल्य देण्यात येते. तसेच भावस्पर्श योजनेत रु. १५००/- देणगी स्वीकारली जाते. त्यातून वर्षातून एकदाच एक रक्तपिशवी आर्थिक दृष्ट्या दुर्बल गरजू रूग्णास विनामूल्य देण्यात येते. अर्थात या देणगीस आयकरात ८० जी नियमानुसार सूट आहेच आपणही या योजनेत सहभाग घेऊन हातभार लावावा जेणेकरून आर्थिक दृष्ट्या दुर्बल व गरजू रूग्णांना विनामूल्य रक्तपुरवठा करणे सहज शक्य होईल. कन्सल्टंट डॉक्टर्सनी शक्यतो जळगाव शहरासारख्या छोट्या जिल्ह्यात सुदैवाने उपलब्ध सर्वाधिक सुरक्षित नॅट टेस्टेड रक्त व रक्तघटकांचा विनियोग करून नॅटयंत्रणा कायम स्वरूपी कार्यान्वित राहण्याकरिता सहकार्य करावे असे कळकळीचे आवाहन करतो.

### जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (DDRC) :-

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, दिव्यांग सशक्तीकरण विभाग अंतर्गतचे दिव्यांगांच्या सर्वांगिण पुनर्वसनासाठी कार्यान्वयीत जिल्हास्तरावरील शासन अंगीकृत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (DDRC) हे सन २०१८ पासून इंडियन रेडक्रॉस सोसायटी मार्फत चालविण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व घटकातील व प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींच्या शारिरीक, मानसिक, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक पुनर्वसनाचे कार्य करणारे एकमेव प्रमुख प्रकल्प कार्यालय आहे. या केंद्रामार्फत प्रामुख्याने जिल्ह्यातील दिव्यांगांना सर्व प्रकारातील सहाय्यक साहित्य मोफत उपलब्ध करुन देण्यात येते, विकासात विलंबता व अध्ययन अक्षमता असलेल्या लहान बालकांना शीघ्र निदान उपचार पद्धतीव्दारा (Early Detection Early Intervention)विविध तज्ञामार्फत स्पिचथेरेपी, फिजीयोथेरेपी, समुपदेशन इत्यादी सेवा तसेच पालकांचे समुपदेशन करून त्यांचा शैक्षणिक व सामाजिक विकास करणे, दिव्यांग व्यक्तींना तसेच पालकांना सल्ला व मार्गदर्शन करणे, मेळावे, शिबीरे आयोजीत करून त्यांना आवश्यकतेनुसार शासनाच्या मदतीने, समन्वयनातून सेवा सुविधा उपलब्ध करुन देणे इ. अनेक स्वरुपाची कार्य करण्यात येत आहे. जळगाव येथील जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र हे राज्यातील एकमेव असे केंद्र आहे कि, ज्यामध्ये दिव्यांग पुनर्वसनासाठी अनेकविध नाविन्यपूर्ण व महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यात DDRC केंद्रामार्फत दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनीय व विशेष कार्य करीत असल्याबद्दल शासनातर्फे गौरविण्यात देखील आले आहे. जिल्ह्यात दिव्यांगांच्या विकासासाठी DDRC केंद्र नेहमी तत्पर व कार्यशील असते.

### ई सेतु व आधार सुविधा केंद्र :-

केंद्र व राज्य सरकारचा उपक्रम असलेले आपले सरकार सेवा केंद्र आणि ई सेतु व आधार सुविधा केंद्र रेडक्रॉसमध्ये सुरू असून, या ठिकाणी शासनाने ठरवून दिलेल्या सेवाशुल्कात सेवा दिली जाते. त्यासाठी स्वतंत्र कक्ष ठेवण्यात आले असून ई सेतु व आधार सुविधा केंद्र रेडक्रॉस भवन, जळगाव येथे सोमवार ते शुक्रवार स.१० ते सायं. ५.०० पर्यंत सुरू असते.

### रेडक्रॉस संचलित जेनेरीक मेडिकल स्टोअर्सचे कार्य जन सेवार्थ सुरु : -

जेनेरीक मेडिसीन भारत सरकार पुरस्कृत उपक्रम असून जनतेला स्वस्त औषधी मिळावी या साठीचा प्रकल्प आहे. या प्रकल्पा अंतर्गतातील फुलफगर फार्मा, विसनजी नगर व रेवती मेडिको जेनेरीक औषधालय, शनिपेठ या ठिकाणी सर्व सामान्य जनतेला नामवंत कंपन्यांची जेनेरिक औषधी स्वस्त दरात उपलब्ध करून दिली जात आहे. या जेनेरिक मेडिकल दुकानांचा अनेक सर्वसामान्य नागरिक लाभ घेत आहेत.

रेडक्रॉसची वास्तू ही शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने आणि शासकीय रुग्णालय जवळ असल्याने मोठ्या प्रमाणात रुग्णांची ये- जा सुरु असते. आर्थिक दृष्ट्या दुर्बल व गरजू रूग्णांना सवलतीच्या दरात औषधे उपलब्ध व्हावी या दृष्टीकोनातून रेडक्रॉस संचलित केदारनाथ मेडिकल स्टोअर्सचे तत्कालीन जिल्हाधिकारी माननीय डॉ. अविनाश ढाकणे यांच्या शुभहस्ते उद्घाटन - २६ जानेवारी २०२० रोजी करण्यात आले. सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत मेडिकल स्टोअर्स सुरु असते. यात सर्व प्रकारची औषधी जसे जेनेरीक मेडिसीनवर छापील किमंतीच्या ६० ते ७० टक्के सवलत, स्टॅंडर्ड मेडिसीनवर ५ ते १० टक्के सवलत व आयुर्वेदिक औषधीही सवलतीत दिली जातात. त्यामुळे ग्राहकांमध्ये विश्वासार्हता निर्माण झालेली आहे. भविष्यात ही सेवा चोवीस तास उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

### रेडक्रॉस संचलित पाटील धर्मार्थ दवाखाना वाघनगर येथे रुग्णसेवेसाठी सज्ज :-

कै.प्रा. शालीग्राम नवलराम पाटील आणि सौ. जिजाबाई शालिग्राम पाटील यांनी दान केलेल्या इमारतीत सुरु केलेल्या रेडक्रॉस संचलित पाटील धर्मार्थ दवाखान्यात महिन्याला जवळपास ५०० ते ७०० रुग्ण सेवेचा लाभ घेत आहेत. तसेच दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी या दवाखान्यात महानगर पालिकेमार्फत गर्भवती महिला व नवजात बालके यांना लसीकरण केले जाते. संपुर्ण कोरोना लॉकडाऊन काळातही पाटील धर्मार्थ दवाखान्या मार्फत उत्कृष्ठ रुग्णसेवा दिली गेली.

### प्रथमोपचार व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण :-

शासकीय,निमशासकीय, कार्यालय, विवीध कंपन्या, कारखाने इत्यादि ठिकाणी कामगारांना आवश्यक लागणारे मान्यता प्राप्त प्रथमोपचार प्रशिक्षण याचे वर्ग आयोजित करून कामगारांना तज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षित करण्यात येते. यात विविध कंपनीतील कर्मचारी व विविध समाजसेवी संस्थांच्या प्रतींनिधींनी प्रशिक्षण घेतले आहे. तसेच आपत्ती येण्याअगोदर, आपत्ती आल्यावर व आपत्ती आल्यानंतर जी परिस्थिती निर्माण होते त्यात आपतग्रस्तांचे जीव वाचवणे, जखमींना प्रथमोपचार करणे, पुढील उपचारासाठी हॉस्पिटलमधे पाठवणे, आपतग्रस्त भागातील प्रभावी क्षेत्राची स्थिती पूर्वपदावर आणणेसाठी कार्य करणे, परिस्थितीवर नियंत्रण मिळवणे या बाबतचे संपूर्ण प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन संस्थेच्या वतीने करण्यात येते आणि तज्ञ प्रशिक्षकांकडून प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात येते. आत्तापर्यंत प्रशिक्षण घेतलेल्या स्वयंसेवकांनी संपूर्ण कोरोना काळात रेडक्रॉसच्या उपक्रमात मोलाचे सहकार्य केले.

### एचआयव्हीग्रस्त बांधवांना मदतीचा हात :-

जळगाव जिल्ह्यातील एचआयव्हीग्रस्तांना रेडक्रॉस व जाणीव बहुउद्देशीय संस्थेतील पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने सकस आहाराचे वाटप करणे, दिवाळी निमित्त कपडे व मिठाई भेट देणे, थंडीपासून बचाव होण्यासाठी स्वेटर, ब्लॅंकेटची मदत करणे, त्यांना रेशन मिळावे म्हणून त्यांना रेशन कार्ड बनवून देणे, आधार कार्ड बनवून देणे, एचआयव्हीग्रस्त मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून चांगल्या मार्कांने पास झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करणे, शैक्षणिक साहित्याची मदत करणे अशा विविध स्वरुपात रेडक्रॉस सहकार्य सतत करीत असते.

### विद्यालयातून प्लॅस्टिक संकलन केंद्र :-

पर्यावरण सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना शाळेतून सवय लागावी या उद्देशाने सागर मित्र,सामनेर या संस्थेचे श्री. विशाल सोनकुळ, यांच्या सहकार्याने रेडक्रॉस मार्फत जळगाव शहरातील विविध शाळेतून प्लॅस्टिक केर कचरा जमा करून त्याची योग्यरीत्या विल्हेवाट करणेबाबतचे कार्य गेल्या दोन वर्षापासून पासून सुरू आहे. जळगाव शहर आणि जवळपासच्या तालुक्यातील ७५ शाळा या उपक्रमात जोडल्या असून नियमित स्वरुपात प्लॅस्टिक कचरा संकलन केले जाते.

### ज्युनियर व युथ रेडक्रॉस अंतर्गत राष्ट्रीय स्तरावरील चित्रकला स्पर्धेचे आयोजन :-

रेडक्रॉस राष्ट्रीय शाखा, न्यू दिल्ली यांचे आदेशाने राष्ट्रीय स्तरावरील चित्रकला स्पर्धेसाठी रेडक्रॉस भवन, जळगाव येथे इयत्ता ८ वी ते १२ वी पर्यंत विद्यार्थ्यांसाठी सेवा ही धर्म या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात जळगाव शहरातील विविध विद्यालय, महाविद्यालयातील एकूण ९५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. यात तीन मुकबधिर विद्यार्थ्यांनी ही सहभाग नोंदवला.यात प्रथम क्रमांक मुकबधीर विद्यार्थिनी कु.विद्या विजयकुमार शेटे, व्दितीय क्रमांक - कु.रूमा मुनीर मुन्शी, तृतीय क्रमांक - कु. प्राची मुकेश कापडणे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. देशातील प्रत्येक राज्य पातळीवरील निवड झालेले विजयी प्रथम दोन स्पर्धक, चित्रकला राष्ट्रीय स्पर्धेसाठी दिल्ली येथे पाठविण्यात येतील व विजयी स्पर्धकांना दिल्ली येथे सन्मान, स्मृति चिन्ह, रोख बक्षीस देण्यात येणार आहे.

### जागतिक रेडक्रॉस दिन साजरा :-

८ मे २०२० रोजी जागतिक रेडक्रॉस दिवस हा कोरोना संसर्गाच्या परिस्थितीमुळे निवडक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी तत्कालीन जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉसचे अध्यक्ष मा. डॉ. अविनाश ढाकणे यांच्या शुभहस्ते रेडक्रॉसचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी रेडक्रॉस गीत सादर करून ध्वजाला मानवंदना दिली.

### कोरोना काळातील रेडक्रॉसचे सेवाकार्य :-

कोरोना विषाणूच्या जागतिक महामारीचा प्रसाराचा उद्रेक पाहता या कोरोना विषाणूच्या प्रतिबंधासंबंधी माहिती आणि सूचना सर्व शासनामार्फत जिल्ह्यांना मिळाल्या. जळगाव जिल्ह्यात माहिती मिळताच इंडियन रेडक्रॉस सोसायटी मार्फत विविध उपक्रमाचे नियोजन करण्यात आले. सूचना मिळताच कोरोना विषाणूबाबत जनजागृतीचे काम हाती घेण्यात आले आणि जिल्ह्यात प्रत्येक लहान मोठ्या गावांपर्यंत कोरोनाबाबत माहिती पोहोचविण्यासाठी रेडक्रॉस मार्फत बनविलेले पोस्टर्स पाठविण्यात आले.

### फिरता दवाखाना व औषधोपचार अंतर्गत विनामुल्य आरोग्य तपासणी :-

कोरोना काळात बरेच दवाखाने बंद असल्याने लहानलहान आजारासाठी जनतेची खूप मोठ्या प्रमाणात हेळसांड होत होती. या आवश्यक गरजेचा विचार करुन संस्थेने दिनांक २ एप्रिलपासून मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून फिरता दवाखाना व विनामुल्य औषधोपचार हा उपक्रम सुरु केला. या उपक्रमाअंतर्गत जळगाव शहरातील आणि जवळपासच्या खेड्यांमधील ७६८३ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली आणि विनामूल्य औषधोपचार ही करण्यात आला. तसेच रेडक्रॉस व रोटरी क्लब जळगाव वेस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण जळगाव शहरातील भाजीपाला व फळ विक्रेते यांची प्राथमिक आरोग्य तपासणीकरून प्रत्येकाला मास्क व सॅनिटायजर देण्यात आले. त्याचप्रमाणे कोरोना काळात हाथ धुण्याचे विशेष महत्व नागरिकांना पटवून दिले. प्रामुख्याने झोपडपट्टी भागातील नागरिकांना त्याचप्रमाणे मनपाचे सफाई ,कचरा उचलणारे कर्मचारी, घंटा गाडीवरील कर्मचारी यांना जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने संस्थे मार्फत २००० डेटॉल साबणचे वाटप करण्यात आले.

### गरजूंना किराणा साहित्याची मदत :-

कोरोना काळात बऱ्याच ठिकाणी मजूर कामगार बांधव अडकून पडले होते. काम नसल्यामुळे त्यांना उपासमारीची वेळ आली होती. अशा परिस्थितीत प्रशासनाच्या मदतीने आणि दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने गरजूंना धान्याचे कीट पोहोचविण्यात आले. यात डाळ, तांदूळ, गहू किंवा पीठ, तेल, साखर, चहा पावडर, मसाले इत्यादी साहित्य होते. असे अन्न धान्याचे ५६० कीट रेडक्रॉसच्या स्वयंसेवकांनी गरजूंना पोहोचविले.

### संस्थांमार्फत तयार जेवण वाटपासाठी स्वयंसेवकांची मदत :-

सुरुवातीच्या लॉकडाऊन काळात शहरातील विविध सामाजिक सेवाभावी संस्थांनी गरजू, गरीब मजुरांना रोज दोन वेळेचे मोफत जेवण पाकिटे पुरविण्याचे कार्य सुरु केले. त्या कार्यास आपल्या संस्थेच्या स्वयंसेवकांनी जेवण पाकिटे वाटप करण्यात मोलाचे सहकार्य केले.

### अन्न हे पूर्ण ब्रह्म कम्युनिटी किचन :-

यानंतर संस्थेने आणि ओसवाल सुख शांती संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अन्न हे पूर्ण ब्रह्म कम्युनिटी किचन हा उपक्रम दि. ११ एप्रिल २०२० पासून ओसवाल सांखला लुंकड मंगल कार्यालय येथे सुरु करण्यात आला. दोन वेळेचे जेवणाचे पाकिटे तयार करून संस्थेच्या स्वयंसेवकांच्या मदतीने शहरातील ३५०० ते ४००० गरजूं नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आले. लॉकडाउनच्या काळात दोन्ही वेळचे जेवण पोहोचविण्याचे कार्य केले. ३१ मे अखेरपर्यंत जवळपास १,३१,९८८ फूड पॅकेट गरजूंना पोहोचविले आहेत. तसेच भुसावळ आणि जळगाव रेल्वे स्थानकावरून पर राज्यातील मजुरांना घेऊन जाणाऱ्या रेल्वे मध्येही जेवण पोहोचविण्याचे कार्य स्वयंसेवकांच्या माध्यमातून करण्यात आले. या व्यतिरिक्त बाहेरील जिल्ह्यातून येत असलेल्या सर्वांना ही जेवण आणि पाणी पोहोचवण्याची काम रेडक्रॉसने केले.

### कोविड- १९ रुग्णांना नाश्ता, फळे, जेवण वाटप :-

महापालिकेच्या आदेशानुसार दि ११ मे २०२० ते २१ जुलै २०२० पर्यंत दररोज १२०० रुग्णांना ,शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालय आणि अभियांत्रिकी महाविद्यालय या ठिकाणी व गणपती हॉस्पिटल येथील रूग्णांसाठी चहा, नाश्ता फलाहार, दोन वेळचे जेवण पूरविले. तसेच जिल्हा सामान्य हॉस्पिटल (कोविड रुग्णालय ) येथे ही फळे देण्यात आली.

### आर्सेनिक अल्बम ३० या होमिओपॅथी औषधी निर्मिती व वाटप :-

कोरोना विषाणूचा सामना करण्यासाठी रोग प्रतिकारक शक्ती वाढवणेकरिता आयुष मंत्रालयाने आर्सेनिक अल्बम-३० या होमिओपॅथी औषधाला मान्यता दिली. जिल्हयातील नागरिकांसाठी आर्सेनिक अल्बम ३० औषधी तयार करण्यात यावी,व हा उपक्रम जिल्हा प्रशासन आणि रेडक्रॉस यांनी संयुक्तपणे राबवावा असे ठरल्यामुळे ,त्याप्रमाणे जिल्हा प्रशासन आणि रेडक्रॉस यांच्या संयुक्त विद्यमाने आर्सेनिक अल्बम ३० या होमिओपॅथी औषधाची निर्मिती रेडक्रॉस स्वयंसेवक, विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, अनेक सेवाभावी संस्थांचे सदस्य यांच्या मदतीने करण्यात आली. या उपक्रमाला आवाहनानुसार अनेकांनी आर्थिक योगदान दिले. यात पंधरा लाख होमिओपॅथी औषधाच्या डब्या तयार करण्यात येऊन जिल्ह्यात वाटप करण्यात आल्या.

### रेडक्रॉस व इकरा कॉलेज यांचे डेडीकेटेड कोविड सेंटर :-

रेडक्रॉस व इकरा एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोनाग्रस्तांसाठी ऑक्सिजनयुक्त १०० बेडची व्यवस्था असेलेले कोविड केअर सेंटर सुरु करण्यात आले.. सेंटर मध्ये १०० बेडसाठी पलंग, गाद्या, उशी, बेडशीट, चादरी असे सर्व साहित्य व ऑक्सिजनची पाईपलाईन रेडक्रॉसच्या वतीने करून देण्यात आली. या उपक्रमासाठी अनेक देणगीदात्यांनी आर्थिक मदत केली. तज्ञ डॉक्टर, प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ व सहकार्य करणारे इतर सर्व सहकारी यांच्या मदतीने सर्व वयोगटाचे ८८६ रुग्ण आत्तापर्यंत बरे होऊन घरी गेले याचा मनस्वी आनंद आहे.

### कोविड रुग्णांच्या उपचारासाठी प्लाझ्मा डोनेशनचा सेवा उपक्रम :-

इंडियन कौन्सिल मेडिकल रिसर्च, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आणि अन्न औषध प्रशासनाच्या परवानगीने रेडक्रॉस रक्तपेढीतर्फे कोविड आजारातून बरे झालेल्या रूग्णांचा प्लाझ्मा डोनेट करून घेणे व तो प्लाझ्मा मागणीनुसार कोरोना ग्रस्त रुग्णांना पुरविणे या कार्यास सुरुवात करण्यात आली. माननीय मुख्यमंत्री मा. श्री. उद्धवजी ठाकरे यांनी व्हिडियो कॉन्फरन्स च्या माध्यमातून या सेवा उपक्रमाचे उद्घाटन केले. यावेळी पालकमंत्री श्री. गुलाबराव पाटील, व इतर मान्यवर उपस्थित होते. आत्तापर्यंत २५ दात्यांनी प्लाझ्मा डोनेशन केले असून ३६ अत्यवस्थ रुग्णांना प्लाझ्मा दिला आहे.

### महाराष्ट्रातील पहिल्या अँटीबॉडी तपासणी केंद्रांचा शुभारंभ :-

अँटीबॉडी तपासणी करण्याची कोणतीही व्यवस्था शासकीय स्तरावर उपलब्ध नसताना हि व्यवस्था नागरिकांना ना नफा ना तोटा या तत्वानुसार उपलब्ध व्हावी या उद्देशाने रेडक्रॉस सोसायटी व तारा कॉम्प्युटराइज लॅबोरेटोरी, जळगाव यांच्या सयुंक्त विद्यमाने अँटीबॉडी तपासणी केंद्रांचा शुभारंभ ३ ऑक्टोंबर २०२० रोजी करण्यात आला. हे अँटीबॉडी तपासणी केंद्र हे महाराष्ट्रातील पहिले केंद्र असून एखाद्या व्यक्तीला कोरोना झाला आहे कि नाही किंवा होऊन गेला आहे का याबाबतच्या शंकेचे समाधान करणे शक्य होत आहे.

संपूर्ण कोरोना काळात जळगाव रेडक्रॉसचे पदाधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवक अतिशय जबाबदारीने आणि समाजाप्रती असलेल्या कर्तव्य भावनेने काम करीत होते. जिल्ह्यात कोरोना संसर्ग आटोक्यात आणण्यासाठी आणि कोरोना रुग्णांना सेवा देण्यात रेडक्रॉस कार्य करु शकली याचे निश्चितच समाधान आहे आपणा सर्वांच्या सहकार्याने संस्थेच्या अतूट नात्याची, अढळ विश्वासाची व ध्येय निष्ठ कर्मयोगाची अनेक वर्ष पूर्ण केली असून संस्थेच्या सेवाकार्याच्या आलेखासाठी व शाश्वत कार्यक्षम व्यवस्था निर्माण करण्यासाठी सर्व कार्यकारिणी मंडळ कटिबद्ध आहे. संस्थेच्या या वाटचालीत आपणही सक्रीय सहभाग घ्यावा व समाधानाची अनुभूती घ्यावी, ही विनंती.

आपल्या सर्वांच्या सदिच्छांच्या बळावर व भक्कम पाठिंब्यामुळे तसेच सेवा... स्नेह... समर्पण... या भावनेतुन हे सर्व प्रकल्प, वर्तमान काळातील उपक्रम तसेच भविष्यकालीन नवनवीन योजना आपण सर्व मिळून नेटाने चालवू अशी आपल्याला ग्वाही देतो. काही सुचना असल्यास अवश्य कळवाव्यात त्या सूचनांचे स्वागतच केले जाईल आणि त्यांची अंमल बजावणी करण्यात आम्हाला आनंदच होईल.

आर्थिक वर्ष सन २०१९ ते २०२० चे जमा खर्चाचे लेखा परीक्षण संस्थेचे सी.ए. श्री परीक्षित भदादे यांनी वेळेत पूर्ण करून दिले. सर्व कार्यकारिणी सदस्यांचा योग्य सहभाग मिळत आहे या सर्वांचे तसेच संस्थेच्या सेवाकार्याच्या विविध उपक्रमांना व दैनंदिन कामकाजास मान्यवरांनी हितचिंतकांनी सेवाभावी संस्थेचे सन्माननीय सभासद, प्रचार प्रसार माध्यमे, रक्तपेढीतील वैद्यकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व प्रशासनातील कर्मचारी, जनसंपर्क अधिकारी, रक्तपेढी कर्मचारी वर्ग व इतर सर्व ज्ञात अज्ञात व्यक्ती, संस्था, हितचिंतक यांनी मोलाचे सहकार्य दिले त्या बद्दल या सर्वांचे आभारी आहोत.

जय हिंद.... जय महाराष्ट्र....

अभिजित राऊत (भा.प्र.से.)
रेडक्रॉस अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी

सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा जळगाव

## Statutory Audit Report Of Indian Red Cross Society , Jalgaon, For 2019-20

### Bhadade Lahoti & Co. Chartered Accountants, Jalgaon.

### STATUTORY AUDITORS REPORT FOR THE YEAR 2019-20

We have audited the attached Balance Sheet of "**M/s Indian Red Cross Society, Jalgaon**" as at **31st March, 2020** and the Income & Expenditure Account for the period ended, on that date incorporating financial statements of Indian Red Cross society(Head Office), Blood Bank Division , DDRC Unit & Generic Division ,PCH Hospital . These Financial Statements are the responsibility of the Management of the Society. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We have conducted the audit in accordance with auditing standards generally accepted in India. Those Standards require that we plan and perform the audit to obtain the reasonable assurance about whether the financial statements are free of material misstatements. An audit includes examining on test check basis, evidence supporting the amounts and disclosures in the financial statements. An audit also includes assessing the accounting principles used and significant estimates made by the management as well as evaluating the overall financial statements presentation. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion.

We Report that:

1. We have obtained all the information and explanation which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of audit. **(Subject To Audit Observation Report Enclosed Herewith)**
2. In our opinion, proper books of accounts as required by law have been kept by the Society so far as it appears from our examination of such books. **(Subject To Audit Observation Report Enclosed Herewith )**
3. The Balance Sheet and Profit & Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and are drawn up in conformity with the law. **(Subject To Audit Observation Report Enclosed Herewith )**
4. In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts subject to above points and our observation contained in the Observation Report, in the manner so required, give a true & fair view. In case of the Balance Sheet, of the state of affairs of the Society as at 31st March, 2020 And In case of the Income & Expenditure Account of the **Surplus** for the year ended on that date.
5. Society had not made the disclosure for the compliances with the applicable accounting standards as issued by ICAI.

**For Bhadade Lahoti & Co**
Chartered Accountants
Firm Reg.No.125927W

**CA Parikshit K. Bhadade**
Partner
M. No. 118214
Date: 10/12/2020.
UDIN 20118214 AAAACP9161

To,
The Members of Managing Committee of
Indian Red Cross Society,
District Branch Jalgaon.

**1. Report on the Financial Statements:**

We have audited the attached Balance Sheet of "Indian Red Cross Society, Jalgaon" as at 31st March, 2020 and the Income & Expenditure Account for the period ended, on that date incorporating financial statements of Indian Red Cross society(Head Office), Blood Bank Division , PCH Hospital & Generic Division.

**2. Management's Responsibility for the Financial Statements:**

The management of trust is responsible for preparation of these Financial Statements that show the correct financial position and financial performance of the Trust. This responsibility includes proper maintenance of all accounting records and statements that are required during audit. It also includes safeguarding of all assets of the Trust and other units for preventing and deducting frauds and any other irregularities; pplication of proper accounting policies, making proper judgments that are prudent in nature; implementation and maintenance of adequate of internal financial controls, that are ensuring accuracy and completeness of accounting records, relevant to preparation and resentation of financial statements that give a true and fair view and that are free from any fraud or error.

**3.Auditor's Responsibility:**

Our responsibility is to express an opinion on the financial statements based on our audit. We have taken into account the provisions of the Act, the Accounting and Auditing Standards and matters which are required to be included in the audit report under the provisions of the act, and the rules and regulations made there under. We conducted our audit in accordance with the Standards on Auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatement. An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and the disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal financial control relevant to the Company's preparation of the financial statements that give a true and fair view in order to design audit procedures that are appropriate in the circumstances. An audit also includes evaluating the appropriateness of the accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by the Trust's management, as well as evaluating the overall presentation of the financial statements. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion on the financial statements. In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid financial statements read together with schedules,significant accounting policies and disclosures, give the information required by the act, rules and regulations in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:

i) in the case of the Balance Sheet, of the state of affairs as on 31/03/2020;

ii) in the case of the Income and Expenditure Account, of the excess of Income over Expenditure for the year ended on that date;

**5.** We report that in, exercise of powers conferred by the first provision to sub-section (4) of section I of Bombay Public Trust Act, 1950 the government of Maharashtra have vide notification no. BPT/1390/350(81)-VI, published in the Official Gazette dated March 19,1992 directed that the Indian Red Cross society, Maharashtra State branch and it's branches situated in the state of Maharashtra registered as a Public Trust under the said Act, shall with effect from the date of publication of the said Notification in the Official Gazette be exempted from all provisions of the said Act, except for those relating to the registration contained in the Chapter IV of the said Act. Accordingly, the Act and Rules framed under Chapter V of the Bombay Public Trust Act,1950 is not applicable to the Trust and hence this report is not in pursuance of Rule 19 of the Bombay Public Trust Rules, 1951.

**6. Further to our comments in Audit Observation Report, we report that:**

i) We have sought and obtained all the information and explanation which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of audit.

ii) In our opinion, proper books of accounts as required by law have been kept by the Trust so far as it appears from our examination of such books.

iii) The Balance Sheet and Profit & Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and are drawn up in conformity with the law.

**For Bhadade Lahoti & Co**
Chartered Accountants
Firm Reg.No.125927W

**CA Parikshit K. Bhadade**
Partner
M. No. 118214
Date: 10/12/2020.
UDIN 20118214
AAAACP9161

## भावपूर्ण विनम्र श्रद्धांजली



रेडक्रॉस माजी राष्ट्रीय अध्यक्ष व माजी राष्ट्रपती
**स्व.प्रणवजी मुखर्जी**
यांना भावपूर्ण आदरांजली





रेडक्रॉस संस्थेचे पेट्रन सभासद,
**स्वर्गीय रतनलालजी बाफना**
यांना भावपूर्ण आदरांजली

अहवाल वर्षातील संस्थेचे दिवंगत सभासद, सभासदांचे दिवंगत आप्तेष्ट, पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांचे दिवंगत आप्तेष्ट, कर्मचारी यांचे दिवंगत आप्तेष्ट, देशातील थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, सैनिक, सुरक्षा कर्मचारी, लेखक, साहित्यीक, पत्रकार, कलावंत, शिक्षणतज्ञ, खेळाडू, सामाजिक कार्यकर्ते, देणगीदाते, रक्तदान शिबीर आयोजक, रक्तदाते, हितचिंतक व ज्ञात अज्ञात सर्व दिवंगताना नम्रतापूर्वक भावपूर्ण श्रद्धांजली !

ईश्वर स्वर्गस्थ आत्म्यांना चिरशांती देवो !

सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा जळगाव

# INDIAN RED CROSS SOCIETY, DIST. BRANCH, JALGAON

## Income & Expenditure Statement

## For the year 2019-20

| PARTICULARS | 2019-20 | | PARTICULARS | 2019-20 | |
|---|---|---|---|---|---|
| Opening Stock (Blood Bank) | | 14,57,766.10 | Sales Accounts | | |
| | | | | | |
| **Direct Exp. :- (Blood Bank)** | | 80,68,217 | **Direct Income :- (Blood Bank)** | | 2,06,66,735.00 |
| Antigen Chemicals | 39,94,295.00 | | Blood Component | 1,49,55,550.00 | |
| Discount Blood Bags | 35,46,798.00 | | Apherisis Charges | 22,94,200.00 | |
| Blood Camp & Collection | 5,27,124.00 | | Blood Service Charges | 7,33,275.00 | |
| | | | Blood Group & Other | 18,210.00 | |
| **Indirect Exp.:- (Blood Bank)** | | 1,16,47,321.05 | NAT Charges | 26,65,500.00 | |
| Staff Salary,EPF,ESI &Allown | 58,20,532.00 | | | | |
| Advertisment Exp. | 36,000.00 | | **Indirect Income :- (Blood Bank)** | | 88,99,996.62 |
| Rent & Taxes | 3,00,000.00 | | Int.Rec.on FDR & Mutual Fund | 35,14,897.82 | |
| Power & Fuel Exp. | 8,20,471.00 | | Out Source Plasma | 41,48,819.00 | |
| Machine & VBD Insurance | 2,23,839.00 | | Int.Rec. on Saving Bank | 32,312.00 | |
| Printing & Stationory | 2,52,421.00 | | Donations | 19,305.00 | |
| Repairs & Maintainance | 5,94,990.00 | | Other Income | 11,84,662.80 | |
| Office & General | 1,49,147.00 | | | | |
| Function & Activities | 59,746.00 | | **DDRC Division :-** | | 6,732.00 |
| Nat Testing Charges | 29,87,839.00 | | Scrap Sales | 6,732.00 | |
| Travellimg & Transportation | 39,649.00 | | | | |
| Telephone Exp. | 34,396.00 | | **Generic Divison :-** | | 2,33,053.00 |
| Audit fees | 39,431.00 | | Medical Sales share, | 2,04,793.00 | |
| Legal & Professional Exp. | 65,738.00 | | OPD Fees | 28,260.00 | |
| Postage & Courier | 2,168.00 | | | | |
| Bank charges | 2,698.05 | | **IRCS Divison :-** | | 3,40,168.00 |
| Security Guard Exp. | 2,18,256.00 | | First Aid Training Fee | 29,400.00 | |
| | | | Int. on Saving Bank & IT Refund | 10,768.00 | |
| **DDRC Division :-** | | 5,92,441.00 | Building Rent | 3,00,000.00 | |
| Salary | 4,68,000.00 | | | | |
| Electricity | 14,360.00 | | **Patil Charitable Hospital Division :-** | | 2,36,178.00 |
| Telephone Bill | 2,356.00 | | Medicine Sales | 1,62,705.00 | |
| Printing & Stationory | 8,273.00 | | OPD & Nursing Fees | 73,473.00 | |
| Audit & Registration Fee | 27,700.00 | | | | |
| Legal & Consulting | 6,230.00 | | **Setu Suvidha Kendra :-** | | 1,74,870.00 |
| Repairs & Maintenance | 6,580.00 | | Setu Kendra Service charges | | 1,74,870.00 |
| Office & General | 4,746.00 | | | | |
| Functions & Activites | 23,030.00 | | | | |
| Travelling & Transportation | 31,166.00 | | **Closing Stock :- (Blood Bank)** | | 8,57,019.00 |
| | | | | | |
| **Generic Division Exp.:** | | 89,192.00 | | | |
| Doctors Salary | 80,000.00 | | | | |
| Printing & Stationory | 1,000.00 | | | | |
| Written off | 8,192.00 | | | | |
| | | | | | |
| **IRCS Expenses :** | | 1,85,285.00 | | | |
| | | | | | |
| Annual General Meeting | 43,114.00 | | | | |
| Bank Charges | 177.00 | | | | |
| DDRC | 3,243.00 | | | | |
| Funtion & Activities | 96,764.00 | | | | |
| Disaster Management | 19,468.00 | | | | |
| First Aid Project | 11,748.00 | | | | |
| Muncipal Tax | 4,253.00 | | | | |
| Printing & Stationory | 58.00 | | | | |
| Transportation | 2,860.00 | | | | |
| Vice-Petron Membersheep Fee | 3,600.00 | | | | |
| | | | | | |
| **Patil Charitable Hospital Exp.:** | | 7,11,638.00 | | | |
| Salary | 4,20,000.00 | | | | |
| Cleaning | 22,811.00 | | | | |
| Electricity | 16,130.00 | | | | |
| Medicine & Nursing Goods | 1,46,036.00 | | | | |
| Office & General | 16,142.00 | | | | |
| Printing & Stationory | 24,228.00 | | | | |
| Repairs & Maintanance | 66,291.00 | | | | |
| | | | | | |
| **Setu Suvidha Kendra Exp.:-** | | 1,32,582.00 | | | |
| Salary | 1,07,154.00 | | | | |
| Jio Wi-Fi Router Recharge | 19,923.00 | | | | |
| Office & General | 160.00 | | | | |
| Conv.charges | 1,420.00 | | | | |
| Printing & Stationory | 2,525.00 | | | | |
| Repair & Maintanance | 1,400.00 | | | | |
| | | | | | |
| **Depriciation :-** | | 23, 28,217.01 | | | |
| Blood Bank | 21,73,665.36 | | | | |
| DDRC | 1,17,517.00 | | | | |
| Generic Division | 5,890.65 | | | | |
| IRCS | 28,688.00 | | | | |
| Patil Charitable Hospital | 2,456.00 | | | | |
| | | | | | |
| **Excess of income Over Exp.:-** | | 62,02,092.46 | | | |
| | | | | | |
| | Total :- | 3,14,14,751.62 | | Total :- | 3,14,14,751.62 |

CA Parikshit K.Bhadade
For Bhadade Lahoti & Co.
Partner

Firm Reg. No.- 125927W
Chartered Accountants
M.No.- 118214

| Satish Charkha<br>Hon.Treasurer | Vinod Biyani<br>Hon.Secretary | Gani Memon<br>Vice President | Abhijit Raut (I.A.S.)<br>President |
|---|---|---|---|

सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा जळगाव

# INDIAN RED CROSS SOCIETY, DIST. BRANCH, JALGAON

## Balance Sheet

### As on 31/03/2020

| Liabilities | As at 31-Mar 2020 | | Assets | As at 31-Mar 2020 | |
|---|---|---|---|---|---|
| **Capital Account** | | 65,54,944.25 | **Fixed Assets :-** | | 2,60,43,595.39 |
| Corpus Fund | 17,60,957.00 | | *Blood Bank Fixed Assets* | 1,35,18,245.77 | |
| Funds & Donations | 47,93,987.25 | | *DDRC Fixed Assets* | 6,72,168.45 | |
| | | | *Generic Fixed Assets* | 50.325.17 | |
| **Current Liabilities :-** | | 11,74,268.00 | *IRCS Fixed Assets* | 1,09,43,543.00 | |
| *Provisions* | 6,00,702.00 | | *Patil Charitable Hospital Fixed Assets* | 8,59,313.00 | |
| *Sundry Creditors* | 4,15,118.00 | | | | |
| *Blood Bank* | 700.00 | | | | |
| *DDRC Division* | 38,800.00 | | | | |
| *Deposits* | 75,000.00 | | **Investments -FDR :-** | | 3,85,60,335.08 |
| *Patil Charitable Hospital* | 36,500.00 | | *Allahabad Bank* | 52,60,262.00 | |
| *Setu Suvidha Kendra* | 7,448.00 | | *Axis Bank Ltd.* | 28,86,455.00 | |
| | | | *Bank of Baroda* | 4,14,380.00 | - |
| | | | *Bank of Maharashtra* | 4,27,371.00 | |
| | | | *Central Bank Of India* | 5,99,107.68 | |
| **Excess of income over expenditure :-** | | 5,94,62,364.56 | *IDBI Bank* | 21,66,005.40 | |
| *Opening Balance* | | | *Jalgaon People Co-Op Bank* | 1,44,907.00 | |
| *Current Pariod* | | | *Axis Blue chip Mutual Fund* | 1,49,99,800.00 | |
| *Less; Transferred* | | | *Punjab National Bank* | 27,38,578.00 | |
| | | | *Union Bank of India* | 33,82,699.00 | |
| | | | *UCO Bank* | 29,35,649.00 | |
| | | | *Vijaya Bank* | 26,05,121.00 | |
| | | | | | |
| | | | **Current Assets :-** | | 25,87,646.34 |
| | | | *Closing Stock* | 8,57,019.00 | |
| | | | *Deposits (Asset )* | 8,58,651.44 | |
| | | | *Loans & Advances(Asset )* | 1,01,000.00 | |
| | | | *Sundry Debtors* | 3,51,722.00 | |
| | | | *Cash in Hand* | 35,096.30 | |
| | | | *Bank Accounts* | 3,84,157.60 | |
| **Total :-** | | **6,71,91,576.81** | **Total :-** | | **6,71,91,576.81** |

## वर्ष – ०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च, २०२० पर्यंतची (रक्तपिशव्यांची उलाढाल)

### रक्तपेढी चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी – तेरा वर्षीय कार्य अहवाल (२००७ ते २०२०)

| अ. क्रं. | उत्पादनाचा प्रकार | ०१/०४/०७-३१/०३/०८ | ०१/०४/०८-३१/०३/०९ | ०१/०४/०९-३१/०३/१० | ०१/०४/१०-३१/०३/११ | ०१/०४/११-३१/०३/१२ | ०१/०४/१२-३१/०३/१३ | ०१/०४/१३-३१/०३/१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संपूर्ण रक्त | ५८९४ | ६५३६ | ८१०३ | १०००० | ११२०० | १४३५० | ११८८८ |
| २ | पी.सी.व्ही. | ४७२ | ८१२ | २१८९ | २४९६ | ३४५३ | ४६१२ | ४५४१ |
| ३ | एफ.एफ.पी. | ५८७ | ८२० | २१८९ | २४९३ | ३४४५ | ४६०६ | ४५३९ |
| ४ | आर.डि.पी. | ०० | ३०४ | ७८३ | ८९२ | १४६४ | २४१० | १९२९ |
| ५ | एस.डि.पी. | ०२ | ९७ | ४२८ | १५१ | २६२ | ३५४ | १९७ |
| ६ | बनविलेले युनिट्स | ६९५५ | ८५६९ | १३६९२ | १६०३२ | १९८२४ | २६३३२ | २३०९६ |
| ७ | एकूण रक्तदाते | ६३६८ | ७४४५ | १०७२० | १२६४७ | १४९१५ | १९३१६ | १६६२६ |
| ८ | आऊट सोर्सिंग | -- | -- | -- | -- | -- | -- | २१२५ |
| ९ | वितरित युनिट्स. | ६७२६ | ८५६७ | १३६६७ | १५६२२ | १९०२७ | २४२७२ | २४०८४ |
| १० | थॅलेसेमिया रुग्णांना विनामूल्य रक्तघटक | २२४ | ३४५ | ४६० | ६६७ | ९७८ | १३४८ | १५५० |

| अ. क्रं. | उत्पादनाचा प्रकार | ०१/०४/१४-३१/०३/१५ | ०१/०४/१५-३१/०३/१६ | ०१/०४/१६-३१/०३/१७ | ०१/०४/१७-३१/०३/१८ | ०१/०४/१८-३१/०३/१९ | ०१/०४/२०१९-३१/०३/२०२० | ०१/०४/२००७ ते ३१/०३/२०२० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संपूर्ण रक्त | ३८९८ | ६५६७ | २७३० | १८८३ | १२४६ | ५४६ | ८४८४१ |
| २ | पी.सी.व्ही. | ८३७३ | ८७३६ | ९०९४ | १०३८० | १०३४३ | ९५८५ | ७५०८६ |
| ३ | एफ.एफ.पी. | २०४७ | ८७३० | ९०९४ | ९१०१ | १०३३९ | १८८७ | ५३११७ |
| ४ | आर.डि.पी. | १००२ | २०६८ | २८९५ | १३९६ | २७८६ | ९८४ | १८९१३ |
| ५ | एस.डि.पी. | १७६ | २२१ | २९१ | २७० | ३०२ | २०५ | २९५६ |
| ६ | बनविलेले युनिट्स | २४४९३ | २६३२२ | २४१०२ | २५८६९ | २५०१६ | २०६०० | २४०३०२ |
| ७ | एकूण रक्तदाते | १५५२४ | १३८४४ | १२११९ | १२४८४ | ११८६६ | १०९६५ | १६४८१४ |
| ८ | आऊट सोर्सिंग | ४८८६ | ७११५ | ६८०८ | ६६८० | ८५३० | ७३९३ | ४३६१७ |
| ९ | वितरित युनिट्स. | २४०६८ | २४६१२ | २२९५१ | २३०३८ | २३६३३ | २०५५० | २३४८९४ |
| १० | थॅलेसेमिया रुग्णांना विनामूल्य रक्तघटक | १७८६ | १९२६ | १५२४ | १५६९ | १६४९ | १७८९ | १५८१५ |

## कोरोना कॉन्व्हॅलीसन्स प्लाझ्मा अफेरेसीस अहवाल २०२०

| प्लाझ्मा दाते | प्लाझ्मा संकलन 200 ML | पिशवी प्लाझ्मा वितरण |
|---|---|---|
| 25 x 2 | 50 | 36 |

## सन ०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च, २०२० पर्यंतचा थँलेसेमिया रुग्णांना विनामूल्य रक्त पुरवठा

| तपशील | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| थॅलेसेमिया रुग्णांना विनामूल्य रक्तघटक | १२० | १५७ | १६३ | १८९ | १६२ | १३० | १३७ | १५२ | १३६ | १३९ | १४५ | १५९ | १७८९ |

## सन ०१ एप्रिल २०२० ते ३१ डिसेंबर २०२० पर्यंतचा थँलेसेमिया रुग्णांना विनामूल्य रक्त पुरवठा

| तपशील | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| थॅलेसेमिया रुग्णांना विनामूल्य रक्तघटक | १०३ | ११३ | १५० | १४४ | १२५ | १०८ | १६३ | १२७ | १३१ | ११६४ |

### रेडक्रॉस संस्थेची मूलतत्वे

**मानवता**– रेडक्रॉस संस्था जगाच्या कोपऱ्यात कोठे ही केवळ मानवतेच्या भूमिकेतून मदत करते. शत्रूराष्ट्र – मित्रराष्ट्र असा भेद भाव होत नाही. केवळ मानवतेच्या भूमिकेतून सर्वांना मदत करणे हे रेडक्रॉस संस्थेला अभिप्रेत आहे. लोकांमधील आपुलकीची, मैत्रिची व सहकार्याची व शांतता पूर्ण जीवन निर्माण करण्याची जाणीव ही संस्था वाढीस लावते.

**नि:पक्षपातीपणा**– राष्ट्र,वंश,धर्म, जात वर्ग, अथवा राजकीय विचार प्रणाली यापैकी कशाचाही विचार मदत देतांना केला जात नाही. मदतीची गरज हा एकच निकष मानून जेथे जास्त गरज आहे तेथे रेडक्रॉस तर्फे मदत पुरवली जाते.

**तटस्थता** – सर्वांचा विश्वास प्राप्त व्हावा तो कायम राहावा यासाठी रेडक्रॉस संस्था कोणत्याही कलहामध्ये कोणाचीही बाजू घेत नाही. राजकारण, धर्मकारण किंवा इतर कोणत्याही तत्सम कारणापासून रेडक्रॉस अलिप्त राहते.

**स्वातंत्र्य** – रेडक्रॉस संस्था नेहमी स्वायत्त ठेवली जाते. केवळ रेडक्रॉस तत्वाच्या आधारावर राष्ट्रीय रेडक्रॉस कार्यरत राहते. राष्ट्रातील सर्व सामान्य नियम रेडक्रॉस पाळीत असली तरी ही मानवतेच्या भूमिकेतूनच त्या काम करतील. सरकारच्या बदलत्या मत प्रवाहांचा प्रभाव रेडक्रॉसवर पडू दिला जात नाही.

**स्वयंसेवा** – कोणत्याही लाभाची अपेक्षा न ठेवता केवळ स्वयंस्फूर्तीने काम करणे रेडक्रॉस संस्थेला अभिप्रेत आहे.

**एकता** – कोणत्याही देशात एक आणि एकच रेडक्रॉस संस्था असते. त्यात सर्वांना मुक्त प्रवेश असला पाहिजे. देशाच्या सर्व भागांमध्ये संस्थेने काम करणे अपेक्षित आहे.

**विश्वव्यापकता** – आंतर राष्ट्रीय रेडक्रॉस चळवळीत सर्व राष्ट्रीय रेडक्रॉस संस्थांना समान दर्जा दिला जातो. सर्वांवर सारख्याच जबाबदाऱ्या व कर्तव्ये सोपविली जातात व त्या जागतिक स्तरावर एकमेकांना मदत करतात.

सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा जळगाव

# INDIAN REDCROSS SOCIETY , DIST.BRANCH, JALGAON

## BUDGET OF INCOME & EXPENDITURE FOR THE YEAR 2020-2021

| Sr.No. | INCOME | BUDGET 2019-20 | ACTUAL 2019-20 | BUDGET 2020-21 | EXPENDITURE | BUDGET 2019-20 | ACTUAL 2019-20 | BUDGET 2020-21 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Blood Service Charges | 20,00,000.00 | 7,33,275.00 | 8,00,000.00 | Advertisement | 15,000.00 | 36,000.00 | 40,000.00 |
| 2 | Blood Component Charges | 1,50,00,000.00 | 1,49,55,550.00 | 1,60,00,000.00 | Antigen & Chemicals | 62,00,000.00 | 39,87,095.00 | 50,00,000.00 |
| 3 | Apheresis Service Charges | 35,00,000.00 | 22,94,200.00 | 26,00,000.00 | Auidit & IT Returne Fee | 70,000.00 | 39,431.00 | 45,000.00 |
| 4 | Blood Groupping Charges | 16,000.00 | 18,210.00 | 20,000.00 | Bank Charges | 4,500.00 | 2,698.05 | 3,500.00 |
| 5 | Blood Bag Reservation Charges | 60,000.00 | 0 | 0 | Blood Donation Camp | 5,50,000.00 | 4,64,948.00 | 5,00,000.00 |
| 6 | NAT Testing Charges | 25,00,000.00 | 26,04,050.00 | 30,00,000.00 | Blood Collection | 25,000.00 | 25,726.00 | 30,000.00 |
| 7 | NAT Testing Service Charges | 0 | 61,450.00 | 0 | Blood Van Maintenance | 10,000.00 | 55,180.00 | 60,000.00 |
| 8 | Expected Int. on Fix Deposit | 23,00,000.00 | 17,27,897.82 | 20,00,000.00 | Machinary Calibration | 80,000.00 | 59,980.00 | 65,000.00 |
| 9 | Int. on S.B. A/c | 36,000.00 | 32,312.00 | 40,000.00 | Cleaning | 1,50,000.00 | 1,26,542.00 | 1,40,000.00 |
| 10 | Grant for Various Social Activites | 9,00,000.00 | 3,92,120.00 | 5,00,000.00 | Depreciation | 20,00,000.00 | 21,73,665.36 | 23,00,000.00 |
| 11 | Misc. Income | 46,000.00 | 7,131.79 | 10,000.00 | Diwali Bonus | 2,80,000.00 | 2,31,939.00 | 3,00,000.00 |
| 12 | Out Source Plasma | 45,00,000.00 | 41,48,819.00 | 45,00,000.00 | Electricity | 7,00,000.00 | 7,43,488.00 | 8,00,000.00 |
| 13 | Bhavsparsh Yojana Donations | 2,000.00 | 0 | 5,500.00 | Employee Provident Fund | 4,50,000.00 | 2,83,691.00 | 4,00,000.00 |
| 14 | Jivandan Yojana Donations | 20,000.00 | 0 | 1,00,000.00 | EPF Admin. Charges | 40,000.00 | 25,515.00 | 30,000.00 |
| 15 | Plasma Apheresis | 10,000.00 | 0 | 5,000.00 | ESIC | 1,50,000.00 | 90,479.00 | 1,25,000.00 |
| 16 | Donations | 50,000.00 | 19,305.00 | 1,25,000.00 | Free Blood Bags & Discount | 35,00,000.00 | 35,32,350.00 | 40,00,000.00 |
| 17 | Sales Scrap Material | 50,000.00 | 6,732.00 | 1,00,000.00 | Functions & Other Activites | 2,00,000.00 | 59,746.00 | 80,000.00 |
| 18 | Patil Charitable Hospital | 0 | 2,36,178.00 | 2,50,000.00 | Generator Diesel | 1,00,000.00 | 58,333.00 | 60,000.00 |
| 19 | Generic Divison | 0 | 2,33,053.00 | 1,00,000.00 | Machi.,Build.,Vehical Insurance | 50,000.00 | 47,139.00 | 70,000.00 |
| 20 | Income Tax Refund | 0 | 7,50,910.00 | 0 | Generic Medicine project | 1,00,000.00 | 95,082.65 | 1,00,000.00 |
| 21 | Int.on Mutual Fund | 0 | 17,87,000.00 | 0 | Postage & Courier | 5,000.00 | 2,168.00 | 3,000.00 |
| 22 | Machinary Insurance claim | 0 | 12,000.00 | 25,000.00 | Printing & stationory | 3,00,000.00 | 2,52,421.00 | 3,00,000.00 |
| 23 | MSCIT Fee Writeoff | 0 | 22,500.00 | 0 | Building Rent | 12,00,000.00 | 3,00,000.00 | 3,00,000.00 |
| 24 | Building Rent | 10,00,000.00 | 3,00,000.00 | 3,00,000.00 | Staff Salary | 55,00,000.00 | 50,07,287.00 | 55,00,000.00 |
| 25 | Int.on Saving Account | 15,000.00 | 6,878.00 | 15,000.00 | Staff Camp & Extra Duty Allowance | 1,70,000.00 | 1,53,521.00 | 1,60,000.00 |
| 26 | Jr / Youth Redcross Fees | 5,000.00 | 0 | 10,000.00 | TDS Related Exp. | 0 | 4,600.00 | 5,000.00 |
| 27 | First Aid Training Fees | 10,000.00 | 29,400.00 | 35,000.00 | Telephone Bills | 45,000.00 | 32,392.00 | 30,000.00 |
| 28 | Membership Fees | 0 | 0 | 5,000.00 | Staff Training | 10,000.00 | 0 | 10,000.00 |
| 29 | Donations | 5,000.00 | 0 | 5,000.00 | Travelling | 45,000.00 | 16,452.00 | 30,000.00 |
| 30 | Disater Management Fund | 1,50,000.00 | 0 | 1,00,000.00 | Repair & Maintaance | 1,60,000.00 | 2,74,506.00 | 3,00,000.00 |
| 31 | Setu Kendra Service Charges | 2,50,000.00 | 1,74,870.00 | 2,25,000.00 | Pest Control | 25,000.00 | 0 | 25,000.00 |
| 32 | Int. Refund on IT | 0 | 3,890.00 | 0 | Annual Maintance Contract | 1,00,000.00 | 59,000.00 | 1,00,000.00 |
| 33 | Covid -19 Relief Operation Fund | 0 | 0 | 1,00,00,000.00 | Staff Walfare | 80,000.00 | 23,700.00 | 50,000.00 |
| 34 | | | | | CME | 20,000.00 | 0 | 20,000.00 |
| 35 | | | | | EQUAS Fees | 5,000.00 | 4,000.00 | 5,000.00 |
| 36 | | | | | Account Finalization Fees | 24,000.00 | 24,000.00 | 24,000.00 |
| 37 | | | | | Consultancy Charges | 10,000.00 | 6,000.00 | 10,000.00 |
| 38 | | | | | FDA Approval Fees | 10,000.00 | 1,400.00 | 5,000.00 |
| 39 | | | | | Law & Legal Fees | 50,000.00 | 400.00 | 1,000.00 |
| 40 | | | | | Office & General | 1,80,000.00 | 1,35,479.00 | 1,50,000.00 |
| 41 | | | | | Transportation | 50,000.00 | 18.052.00 | 40,000.00 |
| 42 | | | | | Fuel & Other Allowances | 35,000.00 | 23,795.00 | 25,000.00 |
| 43 | | | | | Blood Donor Insurance | 2,10,000.00 | 1,76,700.00 | 1,50,000.00 |
| 44 | | | | | NAT Testing Charges | 30,00,000.00 | 29,87,839.00 | 25,00,000.00 |
| 45 | | | | | Rent & Taxes | 12,000,00.00 | 0 | 0 |
| 46 | | | | | Consumable | 35,000..00 | 36,450.00 | 20,000.00 |
| 47 | | | | | Computer Exp. | 10,000.00 | 13,568.00 | 10,000.00 |
| 48 | | | | | Labour Charges | 5,000.00 | 0 | 5,000.00 |
| 49 | | | | | MABB Fees | 1,000.00 | 0 | 1,000.00 |
| 50 | | | | | Fire Protector Reifling | 10,000.00 | 3,186.00 | 10,000.00 |
| 51 | | | | | Gardan Maintanance | 15,000.00 | 9,740.00 | 15,000.00 |
| 52 | | | | | Security Gurad Service Charges | 2,25,000.00 | 2,15,070.00 | 2,25,000.00 |
| 53 | | | | | Tally Software Renewal | 15,000.00 | 0 | 15,000.00 |
| 54 | | | | | Machinary & Equipments | 20,00,000.00 | 0 | 20,00,000.00 |
| 55 | | | | | D.D.R.C. Division | 0 | 7,09,958.00 | 6,00,000.00 |
| 56 | | | | | Patil Charitable Hospital | 5,00,000.00 | 7,14,094.00 | 6,00,000.00 |
| 57 | | | | | Best Employee Award | 0 | 3,000.00 | 5,000.00 |
| 58 | | | | | Generetor Maintance | 0 | 10,042.00 | 10,000.00 |
| 59 | | | | | Internet Bill | 0 | 2,004.00 | 20,000.00 |
| 60 | | | | | Income Tax Concultancy Fees | 0 | 30,838.00 | 10,000.00 |
| 61 | | | | | Quality Control Exp. | 0 | 3,200.00 | 3,500.00 |
| 62 | | | | | Written Off | 0 | 14,448.00 | 15,000.00 |
| 63 | | | | | Building Renovation | 5,00,000.00 | 0 | 3,00,000.00 |
| 64 | | | | | Annual General Meeting | 30,000.00 | 43,114.00 | 30,000.00 |
| 65 | | | | | Printing & Stationary | 10,000.00 | 58.00 | 5,000.00 |
| 66 | | | | | Postage & Courier | 500.00 | 0 | 500.00 |
| 67 | | | | | Municipal Tax | 5,000.00 | 4253.00 | 5,000.00 |
| 68 | | | | | Social Activites | 70,000.00 | 50,925.00 | 60,000.00 |
| 69 | | | | | Depreciation | 35,000.00 | 28,688.00 | 35,000.00 |
| 70 | | | | | Misc. Expensess | 1,000.00 | 0 | 0 |
| 71 | | | | | Jr / Youth Redcross Fees | 5,000.00 | 0 | 5,000.00 |
| 72 | | | | | First Aid Training | 40,000.00 | 11,748.00 | 20,000.00 |
| 73 | | | | | Transportation | 15,000.00 | 2,860.00 | 5,000.00 |
| 74 | | | | | Disater Management Training | 1,50,000.00 | 19,468.00 | 30,000.00 |
| 75 | | | | | Office & General | 2,000.00 | 0 | 5,000.00 |
| 76 | | | | | Setu Suvidha Kendra | 2,15,000.00 | 1,32,582.00 | 1,50,000.00 |
| 77 | | | | | Travelling | 5,000.00 | 0 | 5,000.00 |
| 78 | | | | | Bank Charges | 0 | 177.00 | 500.00 |
| 79 | | | | | Membership Fees Share | 0 | 3,600.00 | 3,000.00 |
| 80 | | | | | Covid -19 Relief Operation | 0 | 45,839.00 | 1,00,00,000.00 |
| 81 | | | | | Stock Adjustment | 0 | 6,00,747.10 | 0 |
| | | | | | **Espected Surplus :-** | **14,17,000.00** | **62,02,092.46** | **27,60,500.00** |
| | **Total :-** | **3,24,25,,000.00** | **3,05,57,731.61** | **4,08,75,500.00** | **Total :-** | **3,24,25,,000.00** | **3,05,57,731.61** | **4,08,75,500.00** |

**Dr. Prasannakumar Redasani (MD,Path)**
**Chairman, Blood Bank**

**Satish Charkha**
**Hon. Treasurer**

**Vinod Biyani**
**Hon. Secretary**

**Gani Memon**
**Vice President**

**Abhijit Raut (I.A.S.)**
**President**

प्रेषक– विनोद बियाणी – मानद सचिव, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा जळगाव.